RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक २८(२)] शुक्रवार, मार्च ७, २०२५/फाल्गुन १६, शके १९४६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ मार्च २०२५.

**अधिसूचना**

**आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.**

क्रमांक आव्यप्र-२०२५/प्र.क्र.२५/आव्यप्र-१.—आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ (२००५ चा ५३) याच्या कलम ७८ ची पोट-कलमे (१) व (२) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन नियम, २०१९ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :-

१. या नियमांस, महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन (सुधारणा) नियम, २०२५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन नियम, २०१९ याच्या नियम ३ ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईल :-

" ३. **राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची रचना** :– राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामध्ये, पुढीलप्रमाणे अध्यक्ष व नऊ सदस्य यांचा समावेश असेल :–

| | | |
|---|---|---|
| (अ) | मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | पदसिद्ध अध्यक्ष ; |
| (ब) | उपमुख्यमंत्री | पदसिद्ध सदस्य ; |
| (क) | अध्यक्षाने नामनिर्देशित करावयाचे इतर मंत्री | पदसिद्ध सदस्य ; |
| (ड) | अध्यक्षाने नामनिर्देशित करावयाच्या,आपत्तीमधील जोखीम कमी करण्याचे ज्ञान व अनुभव असलेल्या व्यक्ती, | अशासकीय सदस्य ; |
| (इ) | अध्यक्ष, राज्य कार्यकारी समिती | पदसिद्ध सदस्य व मुख्य कार्यकारी अधिकारी.” |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. सोनिया सेठी,**
शासनाच्या अपर मुख्य सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 4th March 2025.

*NOTIFICATION*

Disaster Management Act, 2005.

No. DMU-2025/CR. 25/DMU-1.–In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 78 of the Disaster Management Act, 2005 (53 of 2005), the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Disaster Management Rules, 2019, as follows, namely :–

1. These rules may be called the Maharashtra Disaster Management (Amendment) Rules, 2025.

2. For rule 3 of the Maharashtra Disaster Management Rules, 2019, the following rule shall be substituted, namely :–

" 3. *Composition of the State Disaster Management Authority*.– The State Disaster Management Authority shall consist of the Chairperson and nine members as follows :–

| | | |
|---|---|---|
| (*a*) | Chief Minister of Maharashtra, | Chairperson, *ex officio* ; |
| (*b*) | Deputy Chief Ministers, | Members, *ex officio* ; |
| (*c*) | Other Ministers to be nominated by Chairperson, | Members, *ex officio* ; |
| (*d*) | Persons having knowledge and experience in disaster risk reduction, to be nominated by the Chairperson, | non-official Members ; |
| (*e*) | Chairperson, State Executive Committee, | *ex officio* Member and Chief Executive Officer." |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Dr. SONIA SETHI,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.